**प्रेसनोट** दि. ०१/०६/२०२६

आरोपी लोकसेवक अलीफ सुतार पद- महसुल सहाय्यक, नेम. तहसिल कार्यालय, पंढरपूर, रा. दामाजी नगर, धर्मगाव रोड, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर व आरोपी खाजगी इसम मारुती ज्ञानोबा वाघमारे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी त्यांच्या पक्षकारांचे वतीने दाखल केलेल्या जन्म - मृत्यू नोंद होणसाठी आदेश मिळणेकामी दाखल केलेले प्रकरणामध्ये तहसिलदार यांचेसमोर सुनावणी घेवून आदेश देणेसाठी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम २०००/- रू ही सापळा कारवाई दरम्यान स्वतः स्विकारले आहे.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| **पोलीस ठाणे/गुन्हा नोंद क्रमांक** | पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, ७ अ प्रमाणे. |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | १) आलोसे अलीफ शमशुद्दीन सुतार, वय २९ वर्षे, पद- महसुल सहायक, तहसील कार्यालय, पंढरपूर रा. दामाजी नगर, धर्मगांव रोड, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर व<br>२) मारुती ज्ञानोबा वाघमारे, वय ५० वर्षे, खाजगी इसम, रा. मु.पो. येड्राव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २,०००/- रुपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २,०००/- रुपये. |
| **पडताळणी दिनांक** | पडताळणी कारवाई- दि. २९/०५/२०२६ व दि. ०१/०६/२०२६ रोजी, |
| **सापळा दिनांक** | यशस्वी सापळा कारवाई दि. ०१/०६/२०२६ रोजी |
| **सापळा अधिकारी** | श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर |
| **तपास अधिकारी** | श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार हे वकीली व्यवसाय करीत असून त्यांनी त्यांचे विविध पक्षकाराचे वतीने तहसिल कार्यालय पंढरपूर येथील जन्म - मृत्यू नोंद विभाग येथे जन्म - मृत्यूची नोंद होणेकामी आदेश मिळण्यासाठी दाखल केलेले प्रकरणामध्ये लवकरात लवकर तहसिलदार यांचे समोर सुणावणी घेवून आदेश देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक अलीफ सुतार पद- महसुल सहायक, तहसील कार्यालय, पंढरपूर व आरोपी खाजगी इसम मारुती वाघमारे यांनी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष २,०००/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. त्यानंतर करणेत आलेल्या सापळा कारवाईदरम्यान यातील आलोसे सुतार यांनी सदरची लाच रक्कम २०००/- रू ही स्वतः स्विकारले आहे. झाले पडताळणी व सापळा कारवाईवरून आलोसे सुतार व खाजगी इसम वाघमारे यांचे विरूध्द गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया चालू आहे. |

**सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३०, श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ८३९००२६५४९ यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५, रविंद्र लांभाते पोलीस निरीक्षक एसीबी सोलापूर, शैलेश पवार पोलीस निरीक्षक एसीबी सोलापूर, पोलीस हवालदार संतोष नरोटे, पोलीस हवालदार स्वामीराव जाधव, पोकॉ/ गजानन किणगी, पोलीस हवालदार शिरीषकुमार सोनवणे, रामभाऊ घुगे, सलीम मुल्ला, पोकॉ/ राजू पवार, चापोकॉ अक्षय श्रीराम सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करित असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.**

संपर्क पत्ता- पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.
संकेतस्थळ - www.acbmaharashtra.gov.in
ई मेल- www.acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक- १०६४
दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८
व्हॉटस ॲप क्रमांक- ९४०४००१०६४

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

1/6/26

( प्रशांत चौगुले )
सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर